**ठळक बातम्या**

- सर्वपक्षीय बैठकीत सर्व पक्षांकडून ऑपरेशन सिंदूरचं एकमतानं समर्थन, प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभाग आणि मंत्रालय सचिवांच्या उच्चस्तरीय बैठकात राष्ट्रीय सुरक्षेचा आढावा

- तेलंगणात आज सकाळी माओवाद्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंग स्फोटात ग्रेहाऊंड पोलीस दलाचे तीन जवान ठार

- राज्यात आजही अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस/ भाजीपाला तसंच फळपिकांचं नुकसान

**आणि**

- खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत ३४ पदकांची कमाई करत महाराष्ट्र अग्रस्थानी

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्ली इथं संसद भवनात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, शिवसेना नेते श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम, जनता दल युनायटेड आदी पक्षांचे नेते या बैठकीला उपस्थित होते.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी यावेळी ऑपरेशन सिंदुरमागची भारताची भूमिका स्पष्ट केली. दहशतवादाविरोधातल्या लढाईत सर्व राजकीय पक्ष सरकारसोबत असल्याची ग्वाही उपस्थित नेत्यांनी बैठकीत दिली.

या बैठकीत सर्व पक्षांनी भारतीय सैन्याचं अभिनंदन करून या कारवाईचं एकमतानं समर्थन केलं, असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले. अशा कठीण परिस्थितीत आपण सर्वजण सरकारसोबत असल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले…

**होल्ड… बाईट - मल्लिकार्जुन खरगे…**

**<><><><><>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना सद्यस्थितीची माहिती दिली. ऑपरेशन सिंदूर झाल्यानंतर काल डोवाल यांनी जगभरातल्या नेत्यांशी संपर्क साधला आणि पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतानं दहशतवादी तळांवर केलेल्या कारवाईची माहिती दिली.

**<><><><><>**

पंजाबमध्ये फिरोझपूर क्षेत्रात घुसखोरी करणारा एक पाकिस्तानी नागरिक ठार झाल्याचं सीमा सुरक्षा दलानं सांगितलं. अंधाराचा फायदा घेत तो भल्या पहाटे सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करत होता. दरम्यान, अटारी, हुसेनीवाला आणि सदकी इथल्या सीमा बंद ठेवण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

तेलंगणात मुलुगु जिल्ह्यात आज सकाळी माओवाद्यांनी घडवून आणलेल्या भूसुरुंग स्फोटात ग्रेहाऊंड पोलीस दलाचे तीन जवान मृत्युमुखी पडले. मुलुगु जिल्ह्यात वाझीडू पेरूरू वनक्षेत्रात नियमित सराव सुरू असताना हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तेलंगणा-छत्तीसगढ सीमेवर कर्रेगुट्टा भागात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत काही माओवादी ठार झाल्याचीही माहिती मिळत आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यात गंगनानी इथे आज सकाळी एक खासगी हेलिकॉप्टर कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला असून १ जण गंभीर जखमी झाला आहे. या हेलिकॉप्टरमध्ये वैमानिकासह सात जण प्रवास करत होते. डेहराडून इथल्या सहस्त्रधारा हेलिपॅडवरून निघालेलं हे हेलिकॉप्टर चारधाम यात्रेकरूंना घेऊन गंगोत्री इथे निघालं होतं. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून घटनेच्या चौकशीचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबईसह राज्याच्या विविध भागात गेल्या दोन दिवसांपासून तुरळक ठिकाणी पाऊस पडला असून आजही काही भागात पर्जन्यवृष्टी सुुरु आहे. **रायगड** जिल्ह्यात आज सकाळपासून पुन्हा जोरदार पाऊस सुरू झाला असून या अवकाळी पावसाने आंबा पिकाचं नुकसान झाल्यानं शेतकरी चिंतेत आहेत.

**रत्नागिरी** शहर परिसरासह तालुक्यात अनेक ठिकाणी जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं. या पावसाचा मोठा फटका आंबा पिकाला बसला आहे.

**अकोला** जिल्ह्यातल्या अनेक ठिकाणी आज सकाळी पुन्हा पाऊस पडला. अकोला शहरासह अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. अकोल्यातील पणज परिसरात केळी पिकाला या वादळी वाऱ्याचा फटका बसला आहे.

**नाशिक** जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ३४३ गावांमधल्या ८ हजार ६४१ शेतकऱ्यांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज प्रशासनानं व्यक्त केला आहे. पावसामुळे २९९घरांची पडझड झाली. याबरोबरच भाजीपाला, डाळिंब, कांदा, टोमॅटो पिकाचंही नुकसान झाला असून कुक्कुट पालन केंद्रांचही नुकसान झालं.

**<><><><><>**

राज्यातल्या तूर उत्पादक शेतकरी आणि लोकप्रतिनिधींची मागणी लक्षात घेता नाफेड आणि एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीची मुदत पंधरा दिवसांनी वाढवून मिळावी, अशी मागणी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे केली आहे. तसा प्रस्ताव पणन विभागाच्या माध्यमातून केंद्राला पाठवण्यात आला आहे.

राज्यात एक लाख ३७ हजार ४५८ शेतकऱ्यांची तूर खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी झालेली असून, त्यापैकी ५२ हजार ९७१ शेतकऱ्यांकडून ७७ हजार ५३ मेट्रिक टन तूर खरेदी करण्यात आलेली आहे. तूर खरेदीची मुदत १३ मे रोजी संपत आहे.

<><><><><>

बिहारमध्ये सुरु असलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धांमध्ये १६ सुवर्ण, १४ रौप्य आणि १४ कांस्य पदकांची कमाई करून तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र अव्वल स्थानावर आहे. पदक तालिकेत राजस्थान दुसऱ्या तर कर्नाटक तिसऱ्या स्थानावर आहे. सायकलिंग मध्ये आकांक्षा म्हेत्रे हिनं सलग दुसऱ्या दिवशी सुवर्ण तर सिद्धेश घोरपडे यानं रौप्य पदकाची कमाई केली.

<><><><><>

शांघाय इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष संघानं उपांत्य फेरीत डेन्मार्कचा २३२-२३१ असा तर महिलांनी ग्रेट ब्रिटनचा २३२-२३० असा पराभव केला. अंतिम फेरीत भारतीय पुरुष संघाचा सामना येत्या १० मे रोजी मेक्सिकोशी होणार आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात धर्मशाला इथे सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होणार आहे.

<><><><><>

तैपैयी इथं सुरु असलेल्या खुल्या सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आगेकुच सुरु आहे. पुरुषांच्या एकेरीत किदंबी श्रीकांत शंकर सुब्रमण्यम याचा पराभव करत दुसऱ्या फेरीत पोहोचला आहे. महिलांच्या एकेरीत उन्नती हुडानं अनुपमा उपाध्यायचा पराभव करत दुसरी फेरी गाठली आहे.

<><><><><>

२००८ च्या मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेचं विशेष न्यायालय ३१ जुलै रोजी निकाल देण्यात येणार आहे. १९ एप्रिलला सुनावणी झाल्यानंतर न्यायालयानं हा निकाल राखून ठेवला होता. या प्रकरणाची सुनावणी एप्रिलमधेच पूर्ण झाली आहे, मात्र अंतिम निकाल देण्याआधी सर्व कागदपत्रं तपासणं गरजेचं असल्याचं न्यायालयानं सांगितलं. निकालाच्या दिवश सर्व आरोपींना न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणी सात जणांवर खटला सुरू असून यात लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, भाजपाच्या माजी खासदार प्रज्ञा ठाकूर आणि निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेच्या प्रक्रियेच्या नियमनाचं प्रमाणीकरण करण्यासाठी एक नियामक चौकट जाहीर करण्यात आली आहे. या नियामक चौकटीमधे रिझर्व्ह बँकेनं जारी केलेले निर्देश, मार्गदर्शक तत्त्वं, सूचना, आदेश, धोरणं यांचा समावेश असेल. नव्या नियामक चौकटीनुसार नियमांचा मसुदा निवेदनासह रिझर्व्ह बँकेच्या www.rbi.org.in या संकेतस्थळावर प्रकाशित करावा लागणार आहे. बदलत्या परिस्थितीनुसार आरबीआयला नियामक चौकटींचा आढावा घ्यावा लागणार आहे.

<><><><><>

भारतानं वाहन उत्पादन क्षेत्रात जगात तिसरं स्थान मिळवलं आहे, असं केंद्रीय महामार्ग आणि रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज सांगितलं. ते नवी

दिल्लीत आयोजित चौथ्या आंतरराष्ट्रीय जैव ऊर्जा शिखर परिषदेत बोलत होते. देशाच्या मोटारवाहन क्षेत्रात सतत वृद्धी होत आहे, वेगवेगळ्या वाहनांची मागणी वाढत आहे, त्याचप्रमाणे जीवाष्म इंधनाचा वापरही वाढत असल्याचं ते म्हणाले.

//<><><><><>//